V-4.0

हिरानंदानी फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: 4 था मजला, स्कॉर्पिओ हाउस, सेंट्रल अव्हेन्यू, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई, मुंबई- 400076
कॉरपोरेट कार्यालय: 9 वा मजला, सिग्मा, टेक्नोलॉजी स्ट्रीट, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई - 400076,
ईमेल: wecare@hfs.in | वेबसाइट: www.hfs.in | सीआयएन: U65999MH2017PTC291060

HFS Hiranandani Financial Services

सर्वांत महत्वपूर्ण अटी व शर्ती

उत्पादन	अर्जदार आयडी (LOS ID)		कर्जाची रक्कम	
☐ सिक्युअर्ड (प्रतिभूत) व्यवसाय कर्ज				

अर्जदाराचे नाव-	सह-अर्जदाराचे नाव -	सह-अर्जदाराचे नाव -
सीकेवायसी क्रमांक-	सीकेवायसी क्रमांक -	सीकेवायसी क्रमांक -

अधिकथन

मी/आम्ही घोषित करतो की आवेदन फॉर्ममध्ये देण्यात आलेला सर्व तपशील व माहिती ही सत्य, अचूक आणि पूर्ण आहे आणि सदर हे मला/आम्हाला एचएफएसकडून मंजूर करण्यात येऊ शकणाऱ्या कोणत्याही कर्जाचा आधार असेल. मी/आम्ही पुष्टी करतो की माझ्या/आमच्या विरोधात कोणतीही दिवाळखोरीविषयी कारवाई नाही तसेच मला/आम्हाला कधीही दिवाळखोर म्हणून घोषित करण्यात आलेले नाही आणि मी/आम्ही कर्जासंबंधी दस्तऐवज वाचलेले आहेत आणि मला/आम्हाला त्यामधील मजकूर समजलेला आहे. मी/आम्ही समजतो की प्रक्रिया शुल्क हे ना-परतावायोग्य आहे.

मी/आम्ही हे जाणतो की एचएफएस निश्चित व्याज दर पर्यायाच्या अंतर्गत तसेच फ्लोटिंग व्याज दर पर्यायाच्या अंतर्गत कर्ज देऊ करते. मी/आम्ही मान्य करतो की एचएफएस ही तिला गरजेचे असल्याप्रमाणे या आवेदनाच्या संबंधात सदर संदर्भ घेऊ शकते आणि सदर चौकशी करू शकते. मी/आम्ही माझा/आमचा व्यवसाय/नोकरी यांमधील कोणत्याही बदलांच्या बाबतीत एचएफएसला कळवण्याची आणि एचएफएसला आवश्यक असणारी आणखी कोणतीही माहिती प्रदान करण्याची हमी देतो. मी/आम्ही याद्वारे माझ्याकडून/आमच्याकडून आवेदन फॉर्ममध्ये सादर केलेली माहिती/एचएफएसकडून प्राप्त करण्यात आलेल्या सुविधांच्या संबंधात इतर दस्तऐवज हे केवायसी माहिती पडताळणी, आधार अधिनियम 2016 प्रमाणे किंवा वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे यूआयडीएआयसोबत आधार अधिप्रमाणन, क्रेडिट जोखीम विश्लेषण यांसाठी, किंवा इतर एचएफएसला योग्य वाटेल त्या इतर संबंधित हेतूसाठी इतर शाखा, सबसिडियरीज, ॲफिलिएट्स, क्रेडिट ब्युरोज, रेटिंग एजन्सीज, सेवा प्रदाते, बँका/वित्तीय संस्था, शासकीय/नियामक प्राधिकरणे किंवा त्रयस्थ पक्षकार यांच्याकडे, मला/आम्हाला न कळवता उघड करण्यासाठी एचएफएसला प्राधिकृत करतो व संमती देतो.

मी/आम्ही खाजगीपणाचा विशेषाधिकार व कराराची प्रिव्हिटी यांचा अधित्याग करतो आणि सदर प्रकटीकरणामुळे प्रभावी असणारा कोणताही कायदा, नियम, नियमने यांचे उल्लंघन होणार नाही. एचएफएस हे आवेदन विचारात घेण्यासाठी कोणत्याही स्रोताकडील/व्यक्तीकडील माहितीची मागणी करू शकते/प्राप्त करू शकते. मी/आम्ही पुढे मान्य करतो की हे आवेदन करण्याच्या वेळी प्रभावी असणाऱ्या एचएफएसच्या नियमांप्रमाणे माझ्या/आमच्या कर्जाचे नियमन करण्यात येईल आणि सदर नियम हे एचएफएसच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयाप्रमाणे भविष्यामध्ये बदलाच्या अधीन असू शकतात आणि एचएफएस हे त्यासंबंधी कोणतीही कारणे न देता माझे/आमचे आवेदन नाकारण्यासाठी हक्कदार असतील. मी/आम्ही याद्वारे पुष्टी करतो की मी/आम्ही ____________________ भाषा चांगल्या प्रकारे जाणतो व समजतो आणि भविष्यकालीन सर्व संपर्कव्यवहार, यामध्ये कर्ज कराराची प्रत, त्याची सहपत्रे, नोटिसा, आणि इतर संबंधित दस्तऐवज समाविष्ट परंतु तिथपर्यंतच मर्यादित नाही, माझ्या पसंतीच्या भाषेमध्ये प्राप्त करण्याला किंवा मला समजवण्यात येण्याला प्राधान्य देईन.

तुमच्यासोबतच्या आमच्या संबंधांसाठी योग्य असेल त्या मर्यादेपर्यंत, पुढील हेतूंसाठी माझ्या/आमच्या व्यक्तिगत माहितीची देवाणघेवाण करण्यात येऊ शकते:- (ए) लागू कायदे, नियम आणि नियमने यांचे अनुपालन करणे, यामध्ये दहशतवादविरोधी, केवायसी, ॲन्टी-मनी लॉन्डरिंग आणि कर रिपोर्टिंग नियम व नियमने समाविष्ट; (बी) या कर्ज आवेदनाच्या संबंधात योग्य वाटतील असे संदर्भ घेणे आणि चौकश्या करणे आणि कायदेशीर प्रकियेचे पालन करणे, सार्वजनिक, नियामक किंवा शासकीय प्राधिकरणांकडील विनंतीला प्रतिसाद देणे (यामध्ये तुमच्या निवासी देशाबाहेरील प्राधिकरणे समाविष्ट), आणि आम्हाला उपाययोजना करण्यास आणि नुकसान मर्यादित करण्यास अनुमती देणे; (सी) आमचे कोणतेही असोसिएट्स/ॲफिलिएट/ग्रूप एन्टिटीज यांना, यामध्ये नियुक्त आउटसोर्स्ड कार्य पार पाडणारे आमचे सेवा प्रदाते समाविष्ट, अंतर्गत व्यवसाय प्रक्रिया (ज्यामुळे व्यवहार सुलभपणे होतील), उदा. डेटा विश्लेषण, लेखापरीक्षण, नवीन उत्पादने व सेवा विकसित करणे, इत्यादी. पार पाडण्यासाठी सक्षम करणे. (डी) तुम्हाला योग्य उत्पादने व सेवा प्रदान करण्यास सक्षम करण्याकरिता आमचे कोणतेही असोसिएट्स/ॲफिलिएट/ग्रूप एन्टिटीज यांना; तुमच्या व्यक्तिगत माहितीचे संकलन, वापर, प्रकिया आणि देवाणघेवाण यांसाठी तुमची संमती प्रदान न करण्याचा (किंवा कोणत्याही वेळी लिखित सूचना मागे घेण्याचा) तुम्हाला हक्क आहे. तुम्ही तुमची संमती प्रदान न करण्याचा (किंवा ती मागे घेण्याचा) पर्याय निवडल्यास, आम्ही तुम्हाला ठरावीक उत्पादने व सेवा प्रदान करू शकणार नाही.

कर्जासाठी तुमचा आवेदन फॉर्म प्राप्त करण्याचा अर्थ तुमच्या कर्जाला स्वयंचलितपणे मंजुरी मिळाली असा होत नाही. एचएफएस ही या आवेदनाशी संबंधित दस्तऐवजांच्या व्यतिरिक्त दस्तऐवजांसाठी विनंती करू शकते.

मी/आम्ही पुढे मान्य करतो व पुष्टी करतो की: ए. एचएफएस प्रतिनिधीला/कर्मचाऱ्याला या कर्ज आवेदनासह किंवा त्या संबंधात रोख स्वरूपात किंवा इतर स्वरूपात कोणतेही पेमेन्ट प्राप्त होणार नाही. बी. एचएफएसद्वारे किंवा तिच्याा कोणत्याही प्रतिनिधीद्वारे मला/आम्हाला कोणतीही सूट किंवा मोफत भेटवस्तू किंवा इतर कोणत्याही प्रकारची बांधिलकी देण्यात येणार नाही. सी. एचएफएस अपूर्ण/सदोष आवेदन फॉर्मवर प्रकिया करणार नाही, माझ्याकडून/आमच्याकडून त्याबाबत झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी किंवा विलंबासाठी, मी/आम्ही सदर नुकसानासाठी किंवा विलंबासाठी एचएफएसला उत्तरदायी धरणार नाही. डी. आवेदन व इतर सर्व आधारभूत दस्तऐवज प्राप्त झाल्यापासून कमाल 30 दिवसांच्या आत आवेदनासंबंधी निर्णय कळवण्यात येईल.

सर्वांत महत्वपूर्ण अटी

तुमच्या कर्ज आवेदनासाठी धन्यवाद. एचएफएस उत्पादनाची वैशिष्ट्यांशी संबंधित स्पष्टता येण्याची खातरजमा करण्यासाठी, तुम्हाला पुढील गोष्टींची पाहणी करण्याची आणि तुम्हाला सदरच्या स्वीकृतीसाठी स्वाक्षरी करण्याची विनंती करण्यात येते. कृपया तुमच्या पुढील संदर्भासाठी या दस्तऐवजाची प्रत बाळगा.

1. ***गोळा करण्यात आलेले प्रक्रिया शुल्क हे ना-परतावायोग्य असेल.***
2. प्राप्त करण्यात आलेल्या कर्ज सुविधेसाठी लागू व्याज दर हा वितरणाच्या (वितरणांच्या) तारखेला (तारखांना) प्रचलित असणारा दर असेल आणि तो इतर गोष्टींबरोबर अर्हता, क्रेडिट पात्रता, जोखीम प्रोफाइल, सुरक्षितता, परतफेडीची गत कामगिरी, बाह्य रेटिंग्स इत्यादींसंबंधी कंपनीकडून ग्राहकाच्या करण्यात येणाऱ्या मूल्यांकनावर आधारित असेल. कंपनीकडून स्वीकारण्यात आलेल्या व्याज दर मॉडेलच्या आधारावर, सदर प्रोडक्टसाठी व्याज दर व कालावधी हा उपरोल्लिखित घटकांनुसार विविध ग्राहकांसाठी वेगवेगळा असू शकतो.
3. या पत्रावर स्वाक्षरी करून, मी/आम्ही पुर्वोक्तप्रमाणे या आवेदन फॉर्ममधील मजकूर वाचलेला आहे व मला/आम्हाला तो समजलेला आहे आणि मी/आम्ही घोषित करतो की त्याखाली देण्यात आलेली सर्व माहिती सत्य व अचूक आहे आणि सदर मान्य करतो, अभिस्वीकृत करतो, स्वीकारतो आणि त्याची पुष्टी करतो.
4. मी/आम्ही कोणत्याही नोंदणीकृत क्रेडिट ब्युरोजकडून माझा/आमचा क्रेडिट इतिहास प्राप्त करण्यासाठी एचएफएसला प्राधिकृत करतो.
5. मी/आम्ही याद्वारे कर्जाच्या कालावधीदरम्यान कोणत्याही वेळी सीकेवायसीआरमधून माझ्या/आमच्या नोंदी ॲक्सेस करण्यासाठी व डाउनलोड करण्यासाठी माझी/आमची स्पष्ट संमती देतो.
6. मी/आम्ही याद्वारे पुढे घोषित करतो की मी/आम्ही या आवेदन फॉर्ममध्ये वर दिलेल्या तपशीलामधील आणि माहितीमधील कोणत्याही बदलाविषयी एचएफएसला सूचित करेन.

* वरील शुल्क व प्रभार हे संबंधित कर, शैक्षणिक उपकर व इतर शासकीय कर, आकारणी इत्यादींना वगळून आहे. संबंधित प्रभार हे लागू असल्याप्रमाणे प्रभारांच्या अनुसूचीप्रमाणे असतील. कंपनीच्या www.hfs.in या वेबसाइटवर सदर पाहता येऊ शकतील.

अर्जदाराची स्वाक्षरी	सह-अर्जदाराची स्वाक्षरी	सह-अर्जदाराची स्वाक्षरी
नॉन-इन्डिव्हिड्युअल (बिगर-व्यक्ती) अर्जदाराच्या/सह-अर्जदाराच्या बाबतीत, स्वाक्षरीसह शिक्का प्रदान करा.	नॉन-इन्डिव्हिड्युअल (बिगर-व्यक्ती) अर्जदाराच्या/सह-अर्जदाराच्या बाबतीत, स्वाक्षरीसह शिक्का प्रदान करा.	नॉन-इन्डिव्हिड्युअल (बिगर-व्यक्ती) अर्जदाराच्या/सह-अर्जदाराच्या बाबतीत, स्वाक्षरीसह शिक्का प्रदान करा.
शाखेचे नाव	**आरएमचे नाव**	**आरएम कोड**

दिनांक D D M M Y Y Y Y

प्रभार (सर्व प्रभार हे ना-परतावायोग्य आहेत) (अधिक लागू कर)

1. प्रक्रिया शुल्क (ना-परतावायोग्य): कर्ज रकमेच्या 4% पर्यंत किंवा रु.18000/-, जे अधिक असेल ते.	7. इतर दस्तऐवज प्रभार रु. 500/-.
2. इन्स्टॉलमेंट बाउंस प्रभार: प्रति बाउन्स रु.1000/- पर्यंत	8. मुद्रांक शुल्क व इतर सांविधिक प्रभार: वास्तविकप्रमाणे, राज्याच्या कायद्यांप्रमाणे लागू.
3. वार्षिक खाते विवरण/परतफेड वेळापत्रक/प्रोव्हिजनल कर प्रमाणपत्र/एलओडी/फॉरक्लोझर पत्र/स्वागत पत्र दर 12 महिन्यांसाठी एका इश्युअन्सकरिता शून्य तदनंतरच्या/ड्युप्लिकेट रिक्वेस्ट्स- रु.500/- प्रति दस्तऐवज	9. वितरणपश्चात दस्तऐवजाच्या शर्तींचे पालन न केल्याबद्दल किंवा येथे स्पष्टपणे नमूद न केलेल्या इतर महत्वाच्या अटींचे किंवा प्रसंविदांचे उल्लंघन केल्याबद्दल दंडात्मक प्रभार- ए. रु.10 लाखांपर्यंतच्या कर्जासाठी- कर्ज रकमेच्या वार्षिक 1%, कमाल रु.10,000/- च्या अधीन बी. रु.10 लाखांपेक्षा अधिकच्या कर्जासाठी- कर्ज रकमेच्या वार्षिक 1%, कमाल रु.25,000/- च्या अधीन विलंब भरणा दंड प्रभार: पेमेन्ट थकीत असणाऱ्या वास्तविक दिवसांच्या संख्येसाठी थकीत रकमेवर प्रति महिना 2%
4. कर्ज रद्द करण्यासंबंधी प्रभार: रु. 5000/- तसेच, कर्ज वितरणाची तारीख आणि कर्ज रद्द करण्याची तारीख यांच्यामधील अंतरिम कालावधीसाठी व्याज आकारण्यात येईल. शिल्लक हस्तांतरण प्रकरणांसाठी, भरलेले प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही.	10. ॲडहॉक विवरण जारी करण्यासंबंधी प्रभार: रु. 500 प्रति दस्तऐवज.
5. दस्तऐवज रिट्रीव्हल प्रभार: रु. 1000/- प्रति रिट्रीव्हल 6. धनादेश/इन्स्ट्रुमेन्ट स्वॅप प्रभारः रु.५००/- प्रति घटना.	11. पूर्वभरणा/आंशिक पूर्वभरणा/फॉरक्लोजर यासाठी प्रभार आणि लागू शर्ती: ए. 12 ईएमआय प्रदान करण्यापूर्वी पूर्वभरणा करण्यास/आंशिक पूर्वभरणा करण्यास अनुमती नाही. बी. 12 ईएमआय प्रदान केल्यानंतर पूर्वभरणा/आंशिक पूर्वभरणा. थकीत मुद्दल रकमेच्या/पूर्वभरणा केलेल्या रकमेच्या 6% पर्यंत पूर्वभरणा प्रभार पूर्वभरणा करण्यासंबंधी शर्ती: *दर 12 (बारा) महिन्यांमध्ये एकदा, थकीत मुद्दल रकमेच्या कमाल 25% रकमेचा पूर्वभरणा करता येऊ शकतो. सी. वरील हे निश्चित (फिक्स्ड) व्याज दरांच्या कर्जासाठी लागू असेल. डी. व्यक्तींसाठी किंवा सूक्ष्म व लघू उद्यमांसाठी (एमएसईज) व्यावसायिक हेतूकरिता रु.50 लाखांपेक्षा अधिक रकमेच्या मंजूर झालेल्या कर्जाच्या बाबतीत वगळता, वरील तरतुदी फ्लोटिंग दराच्या कर्जासाठी लागू नसतील.

टीप: शुल्क व प्रभारांच्या तपशीलासाठी, कृपया www.hfs.in. या वेबसाइटवर प्रदर्शित केलेल्या शुल्क व प्रभारांच्या अनुसूचीचा संदर्भ घ्या.

ग्राहक अभिस्वीकृती

HFS Hiranandani Financial Services

हिरानंदानी फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 4 था मजला, स्कॉर्पिओ हाउस, सेंट्रल अव्हेन्यू, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई, मुंबई- 400076 **कॉरपोरेट कार्यालय:** 9 वा मजला, सिग्मा, टेक्नोलॉजी स्ट्रीट, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई-400076,
ईमेल: wecare@hfs.in | वेबसाइट: www.hfs.in | सीआयएन: U65999MH2017PTC291060

तुमचे कर्ज आवेदन मिळाल्याचे आम्ही अभिस्वीकृत करतो. अर्जदार आयडी (LOS ID) ____________

अर्जदाराचे नाव ____________

रिलेशनशिप मॅनेजरचे नाव ____________ दिनांक DD MM YYYY

रिलेशनशिप मॅनेजरचा मोबाइल क्र. ____________

टीप:
1. क्रेडिट मूल्यांकन व निर्णय हे हिरानंदानी फायनान्शियस सर्व्हिसेस लिमिटेडच्या (एचएफएस) संपूर्ण स्वेच्छानिर्णयावर अवलंबून आहे.
2. ही आवेदन प्राप्त झाल्याची केवळ एक अभिस्वीकृती आहे आणि याला प्रस्ताव प्राप्त झाल्याचा संकेत मानू नये.
3. आवेदन व इतर सर्व आधारभूत दस्तऐवज प्राप्त झाल्यापासून कमाल 30 दिवसांच्या आत आवेदनासंबंधी निर्णय कळवण्यात येईल. कोणत्याही शंका असल्यास, आम्हाला wecare@hfs.in येथे लिहून त्याबाबत कळवा.